**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.lbp.world

# यवतमाळ जिल्ह्यातील वणी कोळसा खाणीतील श्रमिक कल्याणकार्यच्या अभ्यास

**प्रा. सुनिल नामदेवराव ईश्वार**
शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव, जिल्हा यवतमाळ

**सांराश -**

वणी हे शहर यवतमाळ जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून हे शहर लोह मार्ग व रस्ते या दोन्ही दळवळणाच्या माध्यमानी जोडले गेलेले आहे. हे शहर यवतमाळ असून १०५ कि. मी. अंतरावर आहे.श्रमीक हा उत्पादनाचा महत्वाचा घटक आहे. तो समाधानी असणे आवश्यक आहे. श्रमीक जर पूर्णपणे समाधानी झाला तर संपूर्ण कार्यक्षमतेने कार्य केल्यानंतर रोख स्वरूपात मिळणा-या वेतनाशिवाय श्रमीकांना इतर सोयी सवलती मिळणे आवश्यक आहे. कोळसा खाणीमध्ये काम करणा-या श्रमीकांना फार मोठी जोखीम स्विकारावी लागते. खाणीत काम करतांना काळजी घेतली तरी अपघात होण्याची शक्यता जास्त असते. त्याच्या सुरक्षीततेकरीता प्रबंधकांनी कोणती जबाबदारी स्विकारली आहे.

तसेच खाणीच्या आतील भागात व वरील भागात काम करणा-या श्रमीकाला आरोग्यकारी सोयी पुरविण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत, एखादा श्रमीक कोळसा खाणीत अपघात होऊन जखमी होत असेल, आशिक किंवा पूर्ण विकलांग होत असेल किंवा मरण पावत असेल तर त्याला किंवा त्यांच्या आश्रीतांना कोणत्या सामाजिक सुरक्षा प्रदान केल्या जातात. जे विविध कल्याण कार्यक्रम राबविण्यात येतात त्याचा फायदा श्रमीकांना होतो किंवा नाही, या सर्व बार्बीचा अभ्यास करणे हीच भूमिका संशोधना मागे आहे.

## प्रस्तावना

आज शिक्षण ही काळाजी गरज आहे व शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास, शिक्षणाने माणूस घडतो व तो वेगवेगळया पदावर कार्य करीत असतो. उदा. मॅनेजर, कारकुन, मजूर इत्यादी जर प्रतिष्ठीत, सुखी व समाधानी जीवन जगायचे असेल तर शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाने समाज सुधारतो. विकसीत होतो. जो उच्चशिक्षीत आहे तो भरपूर पैसा कमवितो याउलट जो शिक्षणापासून वंचित आहे त्याला मजुरीशिवाय पर्याय नाही.

स्वातंत्र्यापूर्वी कामगारांची कार्यस्थिती साधारण होती. श्रमीकांच्या कोणत्याही मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात होते. श्रमिक ज्या स्थितीत काम करतो त्या स्थितीबद्दल कारखानदार उदासीन होते. श्रमीकांकडून जास्तीत जास्त काम करून जास्तीत जास्त नफा मिळविणे हे धोरण होते. त्यामुळे मजुरांची स्थिती फारच खालावत गेली व पारतंत्र्यामुळे देशाचीही परिस्थिती खालावत गेली. इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीची छटा भारतातही दिसून आली व भारतातही औद्योगिक क्रांती झाली. यंत्रशक्तीच्या साहाय्याने उत्पादन घेणारे मोठमोठे कारखाने भारतात स्थापन झाले. कालांतराने श्रीमंत भांडवलदार व गरीब मजूर निर्माण होऊन त्यांच्यात संघर्ष होऊ लागला. ब्रिटीशांच्या काळात श्रमीकांची पिळवणूक होऊ लागली. कारखानदारांनी श्रमीक शक्ती स्वतःच्या स्वार्थाकरीता राबविली यातून श्रमीक संघटना निर्माण झाली. श्रमीक संघटना श्रमीकांच्या असंतोषाची दखल घेऊ लागली. श्रमीकांविषयी अनेक कायदे तयार करण्यात येऊ लागले. त्यांच्या कल्याणाबाबत अनेक तरतुदी करण्यात आल्या. श्रमीक हा उत्पादनाचा महत्वपूर्ण सजीव घटक आहे. उत्पादनांच्या वाढीचे बहुतांश यश हे श्रमीकाला जाते. आजच्या औद्योगिकरणाच्या युगातही श्रमीकाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

## श्रमीक कल्याणाची आवश्यकता आणि महत्व

श्रमीक कल्याणाची आवश्यकता आणि महत्व भारतात श्रमीक कल्याणासंबंधी कार्याची किती आवश्यकता आहे. हे जर आपण भारतातील श्रमीकांच्या कार्यस्थळाची व उद्योगाची पाहणी केली असल्यास समजून येईल. तसे पाहता आपला देश औद्योगिकरित्या मागासलेलाच आहे. व सध्या औद्योगिक दृष्टया उत्कर्ष करण्याच्या मार्गावर आहे. त्याअनुषंगाने समजून येईल. तसे पाहता आपला देश औद्योगिकरित्या मागासलेलाच आहे. व सध्या औद्योगिक दृष्टया उत्कर्ष करण्याच्या मार्गावर आहे. त्याअनुषंगाने भारतीय उद्योगाने किंवा उद्योग क्षेत्राने श्रमिकांचे महत्व अजून तरी जाणले नाही. प्रबंधकाचे व श्रमीकांचे परस्परास असलेल्या संबंधाचे विश्लेषन करणारे तत्व अजून तरी भारतात तेवढे विकसीत झालेले नाही. काही मोठया औद्योगिक क्षेत्रांना वगळता अजूनही काही क्षेत्रात श्रमाच्या मोबदल्यात वस्तू हे तत्व अजूनही लागू आहे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की अजूनही श्रमीक व प्रबंधाचे सलोख्याचे संबंध सुधारण्यासंबंधी खुप अंतर आहे. जेव्हा की पाश्चिमात्य राष्ट्रात श्रमिकाला उद्योगातील सहकारी म्हणून संबोधिल्या जाते. व तेवढेच त्याला महत्व आहे. पाश्चिमात्य राष्ट्रात मालकाचे आपल्या उद्योगातील श्रमिका विषयी विचार व सहानुभूतीचे व सहकार्याचे असतात.

त्यानुसार ते श्रमिकांच्या कल्याणाच्या संबंधात आवश्यक असणा-या सोयी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करतात. व हेच श्रमिक प्रबंधकाचे परस्परातील संबंध सलोख्याचे करतात.

औद्योगिक क्षेत्रात कार्य करणा-या श्रमिकांची परिस्थिती तेवढी समाधानकारक नाही. श्रमिकांना आरोग्यास अपायकारक अशा वातावरणात खुप वेळ काम करावे लागते. त्यांच्या जीवनातील दैन्य हाकलून लावण्याकरीता वाईट सवयींच्या आधिन होतात.

कार्यारित व उत्पादन वाढीस आवश्यक असलेले श्रमीक बळ तेव्हाच निर्माण होऊ शकते. जेव्हा श्रमिकांचे राहणीमानास व त्यांच्या कार्यस्थळाची पुरेपूर योग्य ती सुधारणा होईल. हे तेवढेच सत्य आहे. की औद्योगिक क्षेत्रातील श्रमिक पाश्चिमात्य राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील श्रमिकांच्या मानाने गरीब आहे. येथील श्रमिक आपल्या कल्याणाच्या बाबींवर स्वतःच्या उत्पादनातून काहीच खर्च करू शकत नाही. आपल्या येथील औद्योगिक क्षेत्रातील श्रमिक अशिक्षित असल्याकारणाने सर्वसाधारपणे कामचुकार असल्याचे दोषारोपन केले जाते. त्यामुळे त्यांच्या उत्कर्षाकरीता व कल्याणाकरीता उत्तम कामाच्या सोयी असणे अत्यंत आवश्यक आहे. हे अगदी निर्विवाह सत्य आहे की उच्च कामाचा दर्जा त्याच श्रमीकांकडून अपेक्षील्या जावू शकते कि ज्यांना राहण्याचा जागेची उत्तम सोय आहे. ज्याचे आहार पौष्टीक व सकस आहे. औद्योगिक क्रांती तेव्हाच असु शकते जेव्हा श्रमीकाला हे वाटेल कि त्यांचा प्रबंधक त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला देतो. व त्यांच्या प्रबंधकाच्या मनात त्यांच्या विषयी समानतेची वागणूक आहे. औद्योगिक क्षेत्रात असलेल्या असंतोशाचे विश्लेषण केल्यावर हे निर्दशनास येईल की असंतोषाचे मुळ कारण हे आहे की श्रमीकांना असे वाटते की त्यांचा प्रबंधक त्यांना योग्य वागणूक देत नाही. जर प्रबंधकाची श्रमिकांशी चांगले संबंध व वागणूक आहे व त्यांच्या कल्याणाच्या सोयी जर उपलब्ध करून देण्यास आल्या. व ते मनातून जर संतुष्ट झाले की त्यांच्या प्रबंधकाने त्यांना पाहिजे असलेल्या सोयी त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत तर प्रबंधका विषयी असलेल्या कडू भावनास नष्ट होतील. आणि हयाचे प्रयोग टाटा औद्योगिक क्षेत्रात केल्यानंतर त्याचे चांगले निकाल मिळाले आहेत. त्याअनुषंगाने असे म्हटले जाते की भारतातील औद्योगिक क्षेत्रातील श्रमिकांच्या कल्याणाची पाश्चात्य राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील श्रमिकांपेक्षा जास्त आहे.

**श्रमिक कल्याणकार्य**

खाणीच्या राष्ट्रीयकरणाच्या आधीपासून जेव्हा हा व्यवसाय खाजगी क्षेत्रात होता तेव्हा पासून हया क्षेत्रातील श्रमिकांच्या कल्याणाची व त्यांच्या कार्यक्षेत्राच्या सुधारणे विषयी हया क्षेत्रातील प्रबंधक जागरूक होता. किंवा विचारशिल होता. व त्यांना कल्पना होती की हया क्षेत्रातील श्रमिकांचे कल्याण हे प्रबंधक व श्रमिक हयांच्यातील चांगले संबंध प्रस्थापित करू शकतो.

खालील बाबींवरून आपणास लक्षात येईल की वणी कोळसा खाणीतील प्रबंधकांनी श्रमिकांचे कल्याण कार्य केले व भविष्यातील कल्याणासंबंधी कार्याची कल्पना येईल.

**१. पेय जलपूर्तीः**

प्रत्येक कोळसा खाणीत पिण्याच्या पाण्याची तरतूद असणे हि आवश्यक अट आहे. कोळसा खाण अधिनियम १९५२ आणि खाण अधिनियम १९५५ नुसार कामगारांना विनामूल्य पिण्याच्या पाण्याची तरतूद करणे फार मोठे महत्वाचे कार्य आहे.पेय जलपूर्तीत स्लो ॲंड फिल्टर क्लिनरची व्यवस्था करून सध्या त्याची क्षमता ५,००,००० गॅलन करण्यात आली.

**२. स्वच्छता आणि आरोग्यकारी स्थितीः**

स्वच्छता आणि आरोग्यकारी स्थिती असणे हि एक महत्वाची तसेच आवश्यक अट आहे. स्वच्छता आणि आरोग्यकारी स्थिती हि फक्त खाणीच्या वरच्या भागात असणेच महत्वाचे नाही तर खाणीच्या आतमध्ये असणे सुद्धा आवश्यक आहे. तर आरोग्यकारी सोयी पुरेश्या आणि परिणामकारक पुरविलेल्या आहेत तर सर्वांचे (आरोग्य) आजारीपण आपोआपच कमी होण्याची शक्यता आहे.

**३. विश्राम गृहेः-**

विश्राम गृहे हि कामगारांच्या कल्याणाकरीता फारच महत्वाची जागा आहे. कोळसा खाण अधिनियम १९५२ नुसार ज्या खाणीत ५०० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार काम करीत असतील तेथे विश्रामगृहे असलीच पाहिजे अशी तरतूद आहे.

**४. कामाचे तासः-**

खाणी अधिनियम १९५२ नुसार कोणत्याही प्रौढ माणसाला खाणीमध्ये ४८ तासापेक्षा जास्त काम करण्याची परवानगी दिली जात नाही किंवा एका दिवसात ६ तासापेक्षा जास्त आणि एका पाळीच्या कामाचा अवधी हा ८ तासापेक्षा तास्त नसावा.

**उद्देश**

१. श्रमीक व त्याच्या परिवाराला वणी कोळसा खाणी कडून केलेल्याकल्याणकार्यच्याअभ्यास करणे


**गृहीतकृत्ये**

१. वणी कोळसा खाणीतील श्रमीक खाणी कडून केलेल्या कल्याणकार्ययोजनांपासून समाधानी आहेत.

**सारणी क्र. १ कल्याणकार्य योजनांपासून समाधान दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | लोक मान देतात | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुर्णता सहमत | ४२ | २१टक्के |
| २ | सहमत | १०० | ५० टक्के |
| ३ | अनिश्चित | २४ | १२ टक्के |
| ४ | असहमत | १८ | ०९टक्के |
| ५ | पुर्णता असहमत | १६ | ०८ टक्के |
| | **एकुण** | २०० | **१००.००** |

**स्त्रोत : प्रश्नावली वरून**




उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण २०० श्रमीकांपैकी १००श्रमीक हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ५० इतकी आहे. ४२श्रमीक हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २१ इतकी आहे. २४श्रमीक हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी १२ इतकी आहे. परंतु १८श्रमीक हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ०९ इतकी आहे.यवतमाळ जिल्हयातील विकास अतिशय झपाटयाने झाला व होत आहे. तसेच निरनिराळया औष्णीक शक्तीसाठी कोळशाचा वापर होत असल्यामुळे कोळशाला फारच महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. सुरूवातीला मजूरांची संघटना नसल्यामुळे त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. दिवसेंदिवस मजूरांमध्ये देखील सुशिक्षित वर्ग निर्माण झाल्याने त्याचबरोबर त्यांच्या अधिकृत संघटना तयार झाल्याने त्यांच्या मागण्या पूर्ण होऊन त्यांना न्याय मिळत असतो. भविष्यामध्ये हयात आणखीही सुधारणा होण्यास आणि मजूरांच्या दृष्टीने वेगवेगळया सोयी आणि सवलती प्राप्त होण्यासाठी त्या संघटना कार्यरत राहतील.

**निष्कर्ष**

वणीकोळसा खाणीत प्रबंधनामार्फत पुरविल्या जाणा-या आरोग्यकारी सवलती हया बाबतीत श्रमीक समाधानी आहे.विश्रामगृहाच्या मिळणा-या सवलती बाबत समाधानी आहेत. फक्त काही थोडे लोकच असमाधानी आहे. श्रमीक व खाण मालकांचे, आंतरसंबंध, श्रमीक संघटनाचा प्रभाव, दुर्घटना झाल्यास, मिळणारी नुकसान भरपाई याबाबत आहे. वरील बाबींचा परिणाम, श्रमीकांच्या पारिवारिक जीवनावर होतो. याबाबत अभ्यास केला असतांना असे दिसून येते की, श्रमीक त्यांच्या मालकांकडून सहानुभूतीपूर्ण व सन्माननीय वागणूक मिळते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


| अ. क्र. | **लेखक** | **ग्रंथाचे नाव** | **प्रकाशक** |
|---|---|---|---|
| ०१ | श्रम समस्या आणि औद्योगिक संबंध | ज्ञानेश्वर मेघे | विद्या प्रकाशन |
| ०२ | श्रम समस्या एवं समाज कल्याण | आर.सी.सक्सेना | पिंपडापुरे प्रकाशन |
| ०३ | श्रमाचे अर्थशास्त्र- | ज्ञानेश्वर मेघे | रतन प्रकाशन |
| ०४ | काळे/पाटिल | सार्वजनिक वित | लव्हली प्रकाशन |
| ०५ | डॉ. बोधनकर | संशोधन पद्धती | साईनाथ प्रकाशन |
| ०६ | डॉ. भांडारकर | संशोधन पद्धती | दत्त प्रकाशन |
| ०७ | डॉ. वा.भा. पाटिल | पंचायत राज | विद्या प्रकाशन |
| ०८ | अवध किशोर सक्सेना | राजस्व के सिद्धांत | एस.चांद कंपनी |
| ०९ | प्राचार्य. उखळकर | अंकेक्षणाचे सिद्धांत | विद्या प्रकाशन |
| १० | प्रा. व्ही.बी. पाटील | पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | के.सागर प्रकाशन |
| ११ | प्रा. अ.ना. कुलकर्णी | भारतातील स्थानिक स्वशासन | विद्या प्रकाशन |
| १२ | V. N. Chawla | Studies in Local self-Government in India | |
| १३ | S.R. Maheshwari | Local Government in India | |
| १४ | S. R. Nigam | Local Government in India | |
| १५ | D. M. Mithani | Modern Public Finance | Himalaya Publish |
| १६ | डॉ. एस.के.हळबे/<br>डॉ. जी.डी. लोढे | सार्वजनिक आयव्यय | मंगेश प्रकाशन |